**महाराष्ट्र शासन**

उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
ग्राम विकास व जलसंधारण विभाग महाराष्ट्र राज्य
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष यवतमाळ

**<u>कार्यालयीन झेरोक्स मशीन देखभाल व दुरुस्ती चा वार्षिक करार करणे बाबत</u>**

ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातून व जागतिक बँकेच्या अर्थसाह्याने पं. दीनदयाळ उपाध्याय अंत्योदय योजना ( राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची ) सुरुवात केली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यात उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणी जिल्हा स्तरावर जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येते. जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष यवतमाळ व तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष सर्व येथे SHARP व KONICA या कंपनीचे झेरोक्स मशीन खरेदी केल्या आहे तरी सदर मशिनचे देखभाल व दुरुस्ती चा वार्षिक करार करणे करिता सेवा पुरवठादार नेमणे आहे त्याकरिता पुरवठादार / एजन्शी यांच्याकडून दर पत्रक मागविण्यात येत आहे.

उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, ३ रा मजला, रूम नं. ३०७, जिल्हा परिषद यवतमाळ, येथे दि.२१/११/२०२२ दुपारी ५.०० वाजेपर्यंत दर पत्रक बंद लिफाफ्यात सादर करण्यात याव्या. कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या दर पत्रकचा सदर प्रक्रियेमध्ये सहभाग करून घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

डॉ.श्रीकृष्ण पांचाळ (भा.प्र.से.)
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.
तथा जिल्हा अभियान संचालक
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियान,
यवतमाळ

# अर्जाचा नमुना (KONICA)

दिनांक :

प्रती,

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.
तथा जिल्हा अभियान संचालक
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियान
यवतमाळ

**विषय :** - ७ तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष येथील झेरोक्स मशीन दुरुस्ती व देखभाल चा वार्षिक करार करणे बाबत.

**संदर्भ** :- आपली दिनांक / / २०२२ चे पत्र / रोजी प्रसिद्ध झालेली जिल्हा परिषद यवतमाळ येथील संकेतस्थळ वरील जाहिरात .

महोदय,

वरील विषयास अनुसरून मी .......................................... ७ तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष येथील झेरोक्स मशीन दुरुस्ती व देखभाल चा वार्षिक करार करणे करिता दरपत्रक प्रक्रिये मध्ये सहभागी होण्याबाबत लागणारी माहिती खाली प्रमाणे सादर करीत आहोत.

| अ क्र | विवरण | माहिती |
|---|---|---|
| १ | पुरवठादार यांचे नाव | |
| २ | संस्थेचे रजिस्टर नाव | |
| ३ | कार्यालयाचा पत्ता (संपूर्ण पत्ता): | |
| ४ | मोबाईल नंबर | |
| ५ | इ मेल आय डी | |
| ६ | पॅन कार्ड नं | |
| ७ | रजिस्ट्रेशन चे वर्ष | |

| | | |
|---|---|---|
| ८ | एकूण अनुभव (अनुभवाचे झेरॉक्स प्रत जोडावे) वर्षे | |
| ९ | संस्थेचे नाव काळ्या यादीत आहे का ? | |
| १० | पुरवठादार सेल्स & सर्विसेस म्हणून रजिस्टर आहे का? | |
| ११ | OEM प्रमाणपत्र आहे का? असल्यास झेरोक्स जोडण्यात यावे | |

वर नमूद केलेली माहित ही बरोबर असून त्याकरिता मी स्वतः जबाबदार असेल.

संस्थेचे/व्यक्तीचे नाव,पत्ता, शिक्का व स्वाक्षरी

## दर पत्रक (लेटर हेडवर)

दि. :-

प्रती,

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.
तथा जिल्हा अभियान संचालक
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियान
यवतमाळ

**विषय** :- ७ तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष येथील झेरोक्स मशीन दुरुस्ती व देखभाल चा वार्षिक करार करणे करिता दरपत्रक सादर करणे बाबत.

मा. महोदय,

तुमच्या गरजेनुसार, ७ तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष येथील झेरोक्स मशीन दुरुस्ती व देखभाल चा वार्षिक करार करणे करिता आमचे सर्वोत्कृष्ट दर खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहेत -

| **Sr. No.** | **Konica Minolta, Bizhub 215 Xerox machine** | **संख्या** | **Konica Minolta, Bizhub 215 Xerox machine** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Thermistor TL- ALT of RH- HX0001QSZZ | 1 | बाभूळगाव | कळंब | राळेगाव | घाटंजी | पांढरकवडा | झरी | महागाव |
| 2 | GUIDE | 1 | | | | | | | |
| 3 | Rarcher gear (33)T | 1 | | | | | | | |
| 4 | Toner Cartridge MX-237 AT | 1 | | | | | | | |
| 5 | GEAR Spyria | 1 | | | | | | | |
| 6 | Cassetter unit, Complete | 1 | | | | | | | |
| 7 | Cassetter rotation Plate | 1 | | | | | | | |
| 8 | Fusing rear upper paper guide | 1 | | | | | | | |
| 9 | Heat roller (TL) | 1 | | | | | | | |
| 10 | Charging unit | 1 | | | | | | | |
| 11 | Cleaning blade | 1 | | | | | | | |
| 12 | Drum | 1 | | | | | | | |
| 13 | Developer | 1 | | | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 14 | Clutch | 1 | | | | | | | |
| 15 | Photo Sensor | 1 | | | | | | | |
| 16 | Tuner Motor | 1 | | | | | | | |
| 17 | Power Supply | 1 | | | | | | | |
| 18 | D.V. Belt | 1 | | | | | | | |
| 19 | D.V. Unit Bush | 1 | | | | | | | |
| 20 | Pressure Roller | 1 | | | | | | | |
| 21 | Main Drive Gear | 1 | | | | | | | |
| 22 | Ceramic Gear | 1 | | | | | | | |
| 23 | Service Charge | 1 | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

दर पत्रकात दिलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून वरील प्रमाणे सेवा देण्यास आम्ही तयार आहोत.

**सही**

**नाव व शिक्का :** ______________________

**अटी व शर्ती :-**

1. एक व्यक्ती किंवा संस्था यांनी एकच दरपत्रक सादर करावे (SHARP व KONICA करिता वेगवेगळे दरपत्रक सादर करण्यात यावे.)
2. एका पेक्षा जास्त दरपत्रक सादर केली असता ते दरपत्रक रद्द करण्यात येतील
3. सदर करिता ज्या पुरवठादार यांचे दर कमी असतील त्यांनाच पुरवठा आदेश देण्यात येईल. L1 जर काम वेळेत करायला तयार नसतील तर L1व L2 पैकी जो L1च्या किमतीत काम करून देण्यास तयार असेल त्याला काम देण्यात येईल
4. पुरवठादार हा मालक/संस्था/भागीदारी कंपनी इत्यादी असू शकेल व योग्य ठिकाणी नोदणी केले असावी
5. पुरवठादार हा किमान मागील ३ वर्ष पासून झेरोक्स दुरुस्ती क्षेत्रात काम करीत असलेला असणे आवश्यक आहे
6. पुरवठादार यांचेकडे पॅन (PAN) कार्ड असणे आवश्यक आहे
7. पुरवठादार हे वैधानिक बाबी मान्य करण्यास बांधील असेल
8. तालुका अभियान व्यवस्थापन कक्षातील वेळोवेळी झेरोक्स मशीन बिघाड झाल्यास आवश्यक साहित्य पुरवठादाराने पुरवठा आदेश देण्यात आलेल्या दिनांकापासून १० दिवसाचे आंत दुरुस्ती करून देणे बंधनकारक असेल

9. तालुका कार्यालयातील झेरोक्स मशीन दुरुस्ती करण्यापूर्वी या कार्यालयाचे दुरुस्ती करण्याबाबतचे लेखी पत्र घेणे बंधनकारक असेल
10. झेरोक्स मशीन एकदा दुरुस्त केल्यानंतर ८ दिवसाच्या आत पुन्हा तोच बिघाड उद्भवल्यास एकाच वेळेच्या एकाच वेळेच्या दुरुस्तीचे व सर्विस चार्जचे रक्कम अदा करण्यात येईल
11. कोणत्याही सबबी अंतर्गत अग्रिम देता येणार नाही
12. आपले दर पत्रक हे एक वर्षाचे असल्याने कोणत्याही कारणाने करार कालवधीत दर वाढवून मिळणार नाही
13. झेरोक्स मशीन दुरुस्ती करण्यासाटी वापरल्या जाणारे साहित्य मूळ कंपनीचेच (Original) असणे बंधनकारक असेल व पुरवठादार यांच्या कडे OEM प्रमाणपत्र असणे आवश्यक असेल
14. दरपत्रक सोबत दरपत्रक अधिकृत प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
15. पुरवठादाराने उपरोक्त नमूद केल्या व्यतिरिक्त लागणारी इतर आवश्यक साहित्य बाजार भावाप्रमाणे देणे बंधनकारक असेल
16. पुरवठादाराची सेवा समाधानकारक असल्यास उपरोक्त नमूद करण्यात आलेल्या दरकरार नुसार कोणतेही बदल न करता पुढील एक वर्ष कालावधीसाठी रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर मुदतवाढ करारनामा करण्यात येईल
17. सर्व देयके हे धनादेश/RTGS/NEFT/PFMS प्रणालीव्दारे अदा करण्यात येईल
18. झेरॉक्स मशीन करार संपुष्टात येण्यापूर्वी पुरविण्यात येणारी सेवा असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास कोणत्याही क्षणी सदर करार रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार मा. जिल्हा अभियान संचालक, एमएसआरएलएम तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांना असेल
19. अटी व शर्ती मधील कुठल्याही अटीचा अर्थ किंवा कामे यांचा अर्थ लावण्यात वाद निर्माण झाल्यास मध्यस्थ ठरविण्याचा अधिकार हा जिल्हा अभियान व्यवस्थापन कार्यालय यांना असेल
20. पुरवठादार यांना करार कालावधीत जिल्हा अभियान कार्यालयाची लेखी पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करारातील जबाबदाऱ्या यांचे इतरांना हस्तांतरण, प्रतिज्ञा किंवा उपकरार करता येणार नाही
21. पुरवठादार हा राज्य/केंद्र शासनाच्या सर्व नियम अवलंब करण्यास बंधनकारक असेल
22. पुरवठादार यांनी त्यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या पूर्ण करण्याकरिता नेमलेल्या व्यक्ती/कर्मचारी/प्रतिनिधी/मध्यस्थ इत्यादी यांचे मानधन,पगार व भत्ते इत्यादीसाठी जिल्हा अभियान कार्यालय जबाबदार राहणार नाही

डॉ. श्रीकृष्ण पांचाळ (भा.प्र.से.)
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.
तथा जिल्हा अभियान संचालक
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियान
यवतमाळ